# पनवेल महानगरपालिका

*ता. पनवेल, जि. रायगड*

**-कार्यालय** :- आयुक्त मुख्यालय, २ रा मजला, देवाळे तलावाच्या समोर, गोखले हॉलच्या शेजारी, पनवेल - ४१० २०६ दूरध्वनी क्र. 022-27458040/41/42
Email Id : panvelcorporation@gmail.com

जा.क्र.पमपा/घकवि/१६५/२०२५ दिनांक :- ३०/१२/२०२५

## नागरिकांना जाहीर सूचना

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेश क्रमांक रा.नि.आ./मनपा-२०२५/प्र.क्र.८०/का-५, दि.१५/१२/२०२५ अन्वये पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ घोषित करण्यात आलेली आहे. पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ कामी मा. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्रमांक रा.नि.आ./मनपा-२०२५/ प्र.क्र.८४/का-५, दिनांक २९ डिसेंबर २०२५ अन्वये पनवेल महानगरपालिके करिता मुख्य निवडणूक निरीक्षक म्हणून श्री. कैलाश पगारे, आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना (इंटीग्रेटेड चाईल्ड), बेलापूर, नवी मुंबई यांची नेमणूक करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे मुख्य निवडणूक निरीक्षकांना सहाय्य करण्याकरिता निवडणूक निरीक्षक म्हणून श्रीम. मनिषा कुंभार, अपर जिल्हाधिकारी, मैत्री कक्ष-१,मुंबई यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदर मुख्य निवडणूक निरीक्षक व निवडणूक निरीक्षक यांचे कार्यालयाची स्थापना पनवेल महानगरपालिका मुख्य इमारत देवाळे तलावासमोर पनवेल ४१० २०६ या ठिकाणी करण्यात आलेली असून तक्रारीकरिता सर्व नागरिक महानगरपालिका मुख्य कार्यालयातील नागरी सुविधा केंद्र, लँडलाईन क्रमांक ०२२-२७४५८०४०/४१/४२, पनवेल कनेक्ट ॲप तसेच व्हाट्सअप क्रमांक ८९६०९१६०९१ या क्रमांकावर तक्रारी अथवा निवेदने देण्याबाबतीत संपर्क साधू शकता. आचारसंहितेच्या अंमलबजावणी बाबत पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता स्वतंत्र आचारसंहिता कक्षाची स्थापना करण्यात आलेली असून याबाबत कोणतीही तक्रार असल्यास नागरिक संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी तसेच महानगरपालिकेने उपलब्ध केलेल्या तक्रार निवारण सुविधा द्वारा आपल्या तक्रारी नोंदवू शकतात.

**(मंगेश चितळे)**
**आयुक्त**
**पनवेल महानगरपालिका**